महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ २८ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३२९ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पत्रकार हवे आहेत

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

● मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● रायगड ● पालघर ● बोईसर ● वसई ● विरार ● भाईंदर ● पनवेल ● वाडा ● बदलापूर ● शहापूर ● आसनगाव ● भिवंडी ● कसारा ● कर्जत ● सरळगाव ● म्हसा ● धसई ● अंबरनाथ ● विठ्ठलवाडी ● उल्हासनगर ● टिटवाळा ● शहाड ● कोनगाव ● आंबिवली ● दिवा ● कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या "अनादि मी...अनंत मी..." प्रेरणागीताला राज्य सरकारचा पुरस्कार



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने राज्य शासनाने पहिल्यांदाच घोषित केलेल्या 'राज्य प्रेरणागीत पुरस्कार २०२५'चा पहिला सन्मान स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर लिखित "अनादि मी... अनंत मी..." या प्रेरणादायी गीताला देण्यात आला आहे. या विशेष पुरस्कार सोहळ्याचे आयोजन मुख्यमंत्री निवास 'वर्षा' येथे करण्यात आले होते. केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते, तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, आमदार संजय उपाध्ये यांच्यासह सांस्कृतिक कार्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे, तसेच स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानचे रणजित सावरकर, अशीलता राजे, स्वप्निल सावरकर, मंजिरी मराठे आणि अविनाश धर्माधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होते.

## राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अभ्यास व संशोधन केंद्राचे उद्घाटन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई,दि. २७** मुंबई विद्यापीठ स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे शिक्षणाचे स्थळ होते त्यांच्या जीवन आणि कार्याला समर्पित अभ्यास आणि संशोधन केंद्र स्थापन करत असल्याचा अत्यंत स्तूत्य उपक्रम आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याशी संबंधित ठिकाणांना जोडणारा अखिल भारतीय सावरकर सर्किट तयार करण्याचे प्रयत्न व्हावे,असे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी सांगितले.सर कावसजी जहाँगीर दीक्षांत सभागृह, मुंबई विद्यापीठ, फोर्ट येथे आयोजित कार्यक्रमात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार,यांच्या प्रमुख उपस्थिती स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अभ्यास व संशोधन केंद्राचे (ऑनलाइन) उद्घाटन आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४२व्या जयंतीच्या पूर्वसंध्ये निमित्त विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी आमदार अतुल भातखळकर, पराग अळवणी, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. रविंद्र



कुलकर्णी, प्र-कुलगुरु अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांच्यासह प्राध्यापक,विद्यार्थी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकर हे थोर विद्वान, कवी, इतिहासकार, पुरोगामी विचारवंत आणि अग्रणी समाजसुधारक होते. तेअस्पृश्यतेच्या सामाजिक दुष्कृत्याच्या विरोधात होते. त्यांनी अस्पृश्यतेच्या प्रथेला पाप आणि माणुसकीवरील कलंक मानले. ते संपूर्ण रूढीवादाच्या विरोधात उभे राहिले आणि दलितांना मंदिरात प्रवेशासाठी त्यांनी लढा दिला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही जातीभेद निर्मूलनासाठी सावरकरांच्या कार्याचे आणि वचनबद्धतेचे कौतुक केले होते. मुंबई विद्यापीठात स्थापन होत असलेले हे अभ्यास आणि संशोधन केंद्र सावरकरांचे साहित्य, विचार आणि तत्त्वज्ञान यांना प्रोत्साहन देईल तसेच त्यांचा प्रसार करेल असे त्यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात सांगितले.




## भिवंडीत गुन्हे शाखेची यशस्वी कामगिरी

### चोरीच्या सहा मोटारसायकलीसह तीन मोबाईल हस्तगत - नऊ गुन्हे उघडकीस



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी शहर परिसरात चोरी, घरफोडी व वाहन चोरीच्या घटनां घडत असल्याने पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांचा विशेष पोलीस पथकाने सखोल चौकशी तपासणी करीत ठाणे व भिवंडीत गुन्हे करणाऱ्या एका सराईत गुन्हेगारास ताब्यात घेऊन केलेल्या धडक चौकशी कारवाईत त्याच्या जवळून सहा मोटारसायकल व तीन महागडे मोबाईल असा एकूण तीन लाख ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अक्षय दिपककुमार वर्मा उर्फ शिवा (वय २८ आसबीबी रोड.) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार भिवंडी शहरातील नारपोली पोलीस ठाणे येथे दाखल वाहन चोरीच्या गुन्ह्याचा समांतर तपास भिवंडी गुन्हे शाखेचे पोलीस करीत असताना पोलिस हवालदार निलेश बोरसे यांना मिळालेल्या गोपनिय माहितीचे आधारे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक श्रीराज माळी,धनराज केदार,पोलीस उप निरीक्षक रविंद्र पाटील,पोलिस कर्मचारी प्रशांत राणे, किशोर थोरात,सचिन जाधव,सुदेश घाग,निलेश बोरसे,शशिकांत यादव,अमोल इंगळे, उमेश ठाकुर,भावेश घरत,विजय कुंभार या पोलीस पथकाने रेकॉर्ड वरील सराईत आरोपी अक्षय दिपक कुमार वर्मा उर्फ शिवा यास संशयावरून ताब्यात घेवुन त्याच्याकडे केलेल्या चौकशीत त्याने नारपोली येथील वाहन चोरीची कबुली दिली.पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने कापूरबावडी,कासारवडवली, नारपोली,शांतीनगर या पोलिस ठाण्याच्या हद्दीतून त्याने चोरी केलेल्या सहा मोटारसायकल चोरी व तीन मोबाईल फोन ३ लाख ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत करून जप्त केला आहे. त्याने नऊ गुन्ह्यांची कबुली दिली असल्याची माहिती पोलिसांनी दिली.अधिक तपास गुन्हे शाखेचे पोलीस करीत आहेत।

## कल्याण डोंबिवली महापालिकेत समाविष्ट २७ गाव संघर्ष समितीने घेतली पालिका आयुक्तांची भेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महापालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावातील समस्या कायम असून या समस्याबाबत मंगळवारी संघर्ष समितीच्या वतीने पालिका आयुक्त गोयल यांची भेट घेतली. यावेळी २७ गावातील अंतर्गत रस्ते, पाणी पुरवठा, पायवाटा, गटारे यासारख्या मुलभूत सोयीसुविधांबाबतचा पाढा



आयुक्तांसमोर वाचत, आयुक्तांनी या भागातील दौरा करून समस्या समजावून घ्याव्यात अशी मागणी समितीच्या वतीने करण्यात आली. यावेळी आयुक्तांनी दौरा करण्या बरोबरच या मुलभूत समस्या सोडविण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचना देण्याचे आश्वासन दिले.

या भागातील शाळा आणि आरोग्य सेवा जिल्हापरिषदेच्या नियंत्रणाखाली असल्याने या भागात सुविधा मिळत नसून शिक्षणाच्या सुविधा देखील अपुऱ्या असल्याने शाळा आणि आरोग्य सेवा पालिकेत समावून घेण्याची मागणी करण्यात आली. याबाबत शासन स्तरावर चर्चा करून पर्याय काढण्याचे आश्वासन आयुक्तांनी दिले. तर सावळाराम म्हात्रे स्मारकासाठी जागा आणि निधी मंजूर करण्यात आल्याने स्मारकाचे काम लवकरात लवकर सुरु करण्याची मागणी करण्यात आली.

ग्रामीण भागातील ४९९ कामगारांना पालिकेच्या सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न अंतिम टप्प्यात असून तो मार्गी लावण्या बरोबरच अमृत योजनेची मुदत उलटून गेली असली तरी पुढील चार ते पाच महिन्यात हि योजना कार्यान्वित करत या भागातील पाणी प्रश्न सोडविण्याचे आपले उद्दिष्ट असल्याचे सकारात्मक आश्वासन आयुक्तांनी दिले. त्याचवेळी आता या भागाला भेडसावणाऱ्या पाणी प्रश्नावर तोडगा काढण्याची मागणी समिती सदस्यांनी केली. याखेरीज मेट्रोच्या कामामुळे होत असलेली वाहतूक कोंडी आणि नव्या कचर्याच्या ठेकेदाराने शहरातील आणि ग्रामीण भागातील गरजू मुलांना या कामात सामवून घेण्यासाठी सूचना देण्याची मागणी देखील करण्यात आली. याबाबत आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे संघर्ष समितीचे उपाध्यक्ष गुलाब वझे यांनी संगितले.

या बैठकीला समितीचे अध्यक्ष गंगाराम शेलार, उपाध्यक्ष गुलाब वझे,गजानन मांगळूरकर, रंगनाथ ठाकूर, रमेश पाटील, भास्कर पाटील, बाळाराम ठाकूर, दत्तात्रय वझे, ज्ञानेश्वर माळी, वास्तुविशारद राजीव तायशेटे, अनंता पाटील, जितेंद्र ठाकूर, जनार्दन महाराज, गणेश महाराज, शरद पाटील तसेच भानुदास पाटील, समर वझे, किशोर पाटील, शिरीष माळी, दत्ता चौधरी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## टोरंट'चा भोंगळ कारभार !

### कळवा, मुंब्रा, दिव्यातील पाच लाख रहिवाश्यांच्या नशिबी दररोजची अंधारयात्रा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महावितरणची गच्छंती करून वीजपुरवठ्याचा सगळा कारभार हाती घेतलेल्या टोरंट पॉवर कंपनीने मनमानी कारभार करत कळवा, मुंब्रा, दिवावासीयांना 440 व्होल्टचा 'शॉक' दिला आहे. एकीकडे तिप्पट-चौपट बिल आकारणी करून टोरंटने कळवा, मुंब्रा, दिवावासीयांना पिडले असतानाच रोज किमान दहा, पंधरा वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे येथील पाच लाख रहिवाशांच्या नशिबी रोजच अंधारयात्रा आली आहे.

विजेच्या लपंडावामुळे महागड्या उपकरणांची वारंवार दुरुस्ती करावी लागत असल्याने कळवा, मुंब्रा, दिवावासीयांचे बजेटच कोलमडून गेले आहे. कळव्याची लोकसंख्या 2 लाख 32 हजार, मुंब्याची लोकसंख्या 2 लाख 45 हजार तर दिव्याची लोकसंख्या 1 लाख 25 हजार इतकी आहे. 2017 पूर्वी कळवा, मुंब्रा आणि दिवावासीयांना महावितरण कंपनीमार्फत वीजपुरवठा होत असे. २०१७ नंतर 'अदृश्य' राजकीय हातांचा आधार घेत टोरंट पॉवर कंपनीने या तीन शहरात काही ठिकाणी महावितरणला हद्दपार करून आपले बस्तान मांडले. त्यानंतरच येथील लाखो रहिवाशांची पिळवणूक होऊ लागली. अवाचेसवा बिलांनी सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले. त्याविरोधात अनेकवेळा टोरंट कंपनीवर मोर्चे निघाले. परंतु कंपनीच्या निगरगट्ट व्यवस्थापनाने त्यांना दाद दिली नाही.

टोरंट कंपनीच्या बेफिकीर कारभारामुळे कळवा, मुंब्रा, दिवावासीयांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढू लागल्या आहेत. दिवसातून अनेकदा वीजपुरवठा खंडित होत असल्याने फ्रीज, पंखे, टीव्ही, वॉशिंग मशीन, वातानुकूलित यंत्रे यांसारख्या महागड्या उपकरणांचे प्रचंड नुकसान होत आहे. रुग्णालये, शाळा, कार्यालये येथील अत्यंत महत्त्वाचे तास वाया जात आहेत. पाणीपुरवठ्यावरही याचा मोठा परिणाम होत आहे.

## ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा परदेश दौरा रखडला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
शहापूर /राजेश जागरे

शेतक-यांना परदेशी शेतीचा अभ्यास व्हावा,तेथील प्रयोग राज्यातही केले जावेत, या हेतुने शासनाने परदेशात कृषी पर्यटनासाठी शेतकऱ्यांची निवड केली; पण आठ महिन्यांनंतरही परदेशात जाणाऱ्या विमानाने टेक ऑफ केले नसल्याने परदेश अभ्यास दौऱ्यासाठी निवड झालेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून ठेंगा दाखवल्याची भावना पात्र शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.या दौऱ्यासाठी राज्यातील एकुण १६० शेतकऱ्यांपैकी ठाणे जिल्ह्यातील ३ पात्र शेतक-यांसह रायगड,रत्नागिरी, सिंधूदुर्ग, पालघर या पाच जिल्ह्यातील १४ शेतकरी या अभ्यास दौऱ्यात सहभागी आहेत.

परदेशी शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, कृषिमाल प्रक्रिया व पुरवठा साखळी यांची माहिती महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना व्हावी यासाठी कृषी विभागामार्फत हा दौरा आयोजित करण्यात आला.तसेच निधी उपलब्ध होऊनही वर्षभर दौरा अधांतरीच राहिल्याने शेतकरी संभ्रमात आहेत.राज्यातील शेतकऱ्यांना दरवर्षी विविध देशातील विकसित आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती होण्यासाठी शेतकऱ्यांचे दौरे आयोजित केले जातात. २००५ पासून ही योजना सुरू करण्यात आलेली आहे.यामध्ये शेतमालाची निर्यात, कृषी माल प्रक्रिया तसेच विविध देशातील तंत्रज्ञान अवगत करण्याची संधी मिळते. तर त्याचा वापर शेतकरी शेतात करू शकतील, असा उद्देशही या दौऱ्यामागे असतो. परदेशात जाऊन आधुनिक व नवनवीन तंत्रज्ञान शिकण्याच्या उद्देशाने शासनाकडून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून परदेश अभ्यास दौऱ्यासाठी जानेवारी २०२४ मध्ये शेतक-यांकडून पासपोर्ट सहित सर्व माहिती मागवून सात महिन्यानंतरही शासनाने कोणताही निर्णय घेतला नसल्याने हा अभ्यास दौरा का रखडला याची चौकशी होणे गरजेचे आहे.तर पासपोर्ट काढणे आणि त्यासाठी झालेला खर्च आणि मेहनत पाण्यात जाते काय अशी शंका शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.









# गीतासार



## अध्याय ११
## विश्वरूपदर्शनयोगः

न वेदयज्ञाध्ययनैर्न दानैर्न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः । एवंरूपः शक्य अहं नृलोके द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर ॥ ११-४८ ॥

हे अर्जुना, मानवलोकात अशा प्रकारचा विश्वरूपधारी मी वेदांच्या आणि यज्ञांच्या अध्ययनाने, दानाने, वैदिक कर्मांनी आणि उग्र तपश्चर्यांनीही तुझ्याखेरीज दुसऱ्याकडून पाहिला जाणे शक्य नाही. ॥ ११-४८ ॥

मा ते व्यथा मा च विमूढभावो दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्ममेदम् । व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं तदेव मे रूपमिदं प्रपश्य ॥ ११-४९ ॥

माझे या प्रकारचे हे भयंकर रूप पाहून तू भयभीत हौऊ नकोस किंवा गोंधळून जाऊ नकोस. तू भीती सोडून प्रीतियुक्त अंतःकरणाने तेच माझे हे शंख-चक्र-गदा-पद्म धारण केलेले चतुर्भुज रूप पुन्हा पाहा. ॥ ११-४९ ॥

सञ्जय उवाच इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा स्वकं रूपं दर्शयामास भूयः ।

आश्वासयामास च भीतमेनं भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा ॥ ११-५० ॥
संजय म्हणाले, भगवान वासुदेवांनी अर्जुनाला असे सांगून पुन्हा तसलेच आपले चतुर्भुज रूप दाखविले आणि पुन्हा महात्म्या श्रीकृष्णांनी सौम्य रूप धारण करून भयभीत अर्जुनाला धीर दिला. ॥ ११-५० ॥

अर्जुन उवाच दृष्ट्वेदं मानुषं रूपं तव सौम्यं जनार्दन । इदानीमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः ॥ ११-५१ ॥

अर्जुन म्हणाला, हे जनार्दना, आपले हे अतिशय शांत मनुष्यरूप पाहून आता माझे मन स्थिर झाले असून मी माझ्या मूळ स्थितीला प्राप्त झालो आहे. ॥ ११-५१ ॥

श्रीभगवानुवाच सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम । देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकाङ्क्षिणः ॥ ११-५२ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, माझे जे चतुर्भुज रूप तू पाहिलेस, ते पाहावयास मिळणे अतिशय दुर्लभ आहे. देवसुद्धा नेहमी या रूपाच्या दर्शनाची इच्छा करीत असतात. ॥ ११-५२ ॥

# रेसिपी
## मिक्स व्हेज पराठा

साहित्य : 2 कप गव्हाचे पीठ भाज्या शिजवून (बटाटा, गाजर, मटार, बीन्स, इ),वेजीटेबल स्टॉक पीठ मळायला,मीठ चवीनुसार,पाणी गरजेनुसार,1 टेबलस्पून तेल,1 टिस्पून मोहरी,1/2 टिस्पून हळद,1/4 टिस्पून हिंग,2 टेबलस्पून हिरवा ठेचा (लसूण, आले, मिरची, कोथिंबीर),1 टेबलस्पून धणे पूड,तेल भाजण्यासाठी

कृती : प्रथम भाज्या निवडून, गाजर, बटाटा सोलून घ्या. नंतर त्यात पाणी घालून कुकर मध्ये 2/3 शिट्या करा. नंतर कुकर गार झाल्यावर भाज्या बाहेर काढा. व चाळणी वर ठेवून त्याचे पाणी एका वाडग्यात काढा. ते पाणी आपल्याला पीठ माळण्यासाठी वापरायचे आहे. व भाज्या मॅश कराव्या.
गव्हाचे पीठ, मीठ आणि वेजीटेबल स्टॉक, तेल थोडेसे, घालून घट्ट गोळा मळून घ्या. (पाणी लागले तर वापरू शकता)एका काढल्यात तेल घाला, मोहरी घाला, हिंग, हळद घाला व त्यात हिरवा ठेचा छान परतून घ्यावा. भाज्या मॅश करून घेतलेल्या, हिरवा ठेचा, धणे पूड, मीठ घालून एकजीव करा. तयार भाजी चे गोळे एकसारखे करावे.पिठाचा एक गोळा घ्या व त्यात भाजीचा गोळा घालून स्टफ करा व काठ बंद करून कोरड्या पिठात घोळवून हलक्या हाताने लाटून घ्या. तवा तापवून पराठा दोन्ही बाजूने तेल लावून खरपूस, खमंग भाजून घ्या. मिक्स व्हेज पराठे तयार आहेत.गरम गरम सर्व्ह करा. त्याचा बरोबर घट्ट दही, लोणचं/सॉस बरोबर आस्वाद घ्यावा.

# क्रांतीकारकांचे मुकुटमणी स्वातंत्र्यवीर सावरकर

(२८ मे १८८३ - २६ फेब्रुवारी १९६६)



भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सशस्त्र क्रांतीचे धुरीण, हिंदुत्वाच्या तत्वज्ञानाचे गाडे अभ्यासक, विज्ञानाचे पुरस्कर्ते, नामवंत कवी, प्रतिभावंत साहित्यिक, जहालवादी वक्ते,
जातीभेद- अंधश्रद्धेचे कट्टर विरोधक व कडवे देशभक्त स्वातंत्र्यवीर सावरकर उर्फ विनायक दामोदर सावरकर यांना जयंती दिनानिमित्त भावपूर्ण आदरांजली! वीर सावरकर यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील भगुर येथे २८ मे १८८३ रोजी दामोदर सावरकर यांच्या देशभक्त घराण्यात झाला अन् जणू काही क्रांतीकारकांचा मुकुटमणी उदयास आला.वास्तवात सावरकर यांचं घराणं म्हणजे क्रांतीकारकांची खाण म्हणावी.विनायकसह त्यांचे थोरले बंधू बाबाराव अन् धाकटे बंधू नारायणराव यांनीही आपलं सारं आयुष्य देशाच्या स्वातंत्र्यासाठी पणाला लावलं. सावरकरांच्या आईचे नाव राधाबाई सावरकर तर,पत्नीचे नाव यमुनाबाई उर्फ माई.सावरकरांचे माध्यमिक शिक्षण नाशिक येथील शिवाजी विद्यालयात तर,उच्च शिक्षण पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये झाले.याशिवाय त्यांनी लंडन येथे बॅरिस्टरची पदवी संपादन केली.अर्थातच ते उच्च विद्याविभूषित होते.

भारतभूमीला ब्रिटिश राजवटीतून मुक्त करण्यासाठी सावरकरांनी आपलं सारं आयुष्य पणाला लावलं.सावरकरांचं घराणं हे देशभक्तांचं केंद्रस्थान होतं.परिणामी विनायकच्या हृदयात लहानपणापासूनच स्वातंत्र्याची ज्योत धगधगत होती. सावरकरांच्या मनावर जोसेफ मॅझिनी यांच्या ग्रंथाचा मोठा पगडा होता.वास्तवात या ग्रंथाच्या प्रेरणेतूनच त्यांनी सशस्त्र क्रांतीचा पवित्रा घेतला.या पुस्तकातील आत्मचरित्र सावरकरांनी मराठी भाषेत शब्दबद्ध केलं. हेच पुस्तक खऱ्या अर्थाने पुढे क्रांतिकारकांसाठी प्रेरणादायी ठरले.

उल्लेखनीय गोष्ट म्हणजे सावरकरांनी छत्रपती शिवाजी महाराज अन् लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रभक्तीचा आदर्श घेतला.त्यातूनच त्यांच्यात स्वराज्याची ओढ निर्माण झाली.या सर्व गोष्टींचा सखोल अभ्यास करून सावरकरांनी *१८५७ चे स्वातंत्र्य समर* हा ग्रंथ लिहिला.दरम्यान क्रांतीवीर चाफेकर बंधूंना ब्रिटिश सरकारने फाशीची शिक्षा दिल्याचे वृत्त कानी पडल्यावर कुलदेवता अष्टभुजादेवीला साकडे घालत,त्यांनी 'मारिता.. मारिता... मरे तो झुंजेन" ही प्रतिज्ञा घेतली.महत्वाचे म्हणजे वयाच्या १५ व्या वर्षीच त्यांनी "स्वदेशीचा फटका" अन् "स्वतंत्रतेचं स्तोत्र या काव्य रचना लिहून जनमानसात स्वातंत्र्याची ज्योत पेटवली. एक सच्चा देशभक्त म्हणून भारतीयांच्या हृदयात आजही त्यांना मोठं मानाचं स्थान आहे. यास्तव सावरकरांना त्रिवार मानाचा मुजरा...!

**वीर सावरकरांनी सशस्त्र क्रांतीची मुहूर्तमेढ**

रोवण्याच्या उद्देशाने १ जानेवारी १९०० रोजी नाशिक येथे "मित्रमेळा" ही संघटना उभारली अन् त्यातील काही जहालवादी युवकांची निवड करून १९०४ मध्ये "अभिनव भारत" ही संघटना उभारून त्यातील क्रांतीवीरांना "सेनापती बापट" यांच्या नेतृत्वाखाली बॉम्ब बनविण्याचं प्रशिक्षण घेण्यासाठी खास पॅरिसला रवाना केलं."हिंदुत्वाच्या तत्वज्ञानाचा विरोध करणाऱ्यांनी अंधमानची भूमी खणून पहावी अन् त्यात सापडलेली हुतात्म्यांची हाडकं तपासून पहावीत,म्हणजे त्यांना हिंदूंच्या बलिदानाचा इतिहास कळून येईल",असं सावरकरांनी ठणकावून सांगितले. कुठल्या अन् कोणत्या देशभक्तांनी अंदमानच्या बेटावर काळ्या पाण्याची शिक्षा भोगली? याचं एका शब्दात उत्तर म्हणजे "हिंदू"असा त्यांनी निर्वाळा दिला. जीवनाच्या शेवटच्या घडीपर्यंत सावरकरांनी हिंदुत्वाची नाळ अटूट ठेवली.

युवाशक्तीचा स्वातंत्र्य लढ्यात सहभाग वाढावा,या दृष्टिकोनातून त्यांनी "समर, मॅझिनी,माझी जन्मठेप" ही पुस्तके लिहून जांबाज भारतीय युवकांमध्ये वितरित केली. उल्लेखनीय बाब म्हणजे देशभक्तीपर लिहिलेल्या या ग्रंथांतून "वीर भगतसिंग" व त्यांच्या क्रांतिकारी अनुयायांना प्रेरणा मिळाली,तर "नेताजी सुभाषचंद्र बोस" यांच्या आझाद हिंद सेनेला बळ मिळालं.या पार्श्वभूमीवरच सावरकरांना "क्रांतिकारकांचे मुकुटमणी" म्हणून भारत भूमीवर भूषविलं गेलं.

ब्रिटिशांच्या जुलमी सत्तेला शह देण्याच्या हेतूने एक साफळा रचून क्रांतिकारी "चाफेकर बंधू" यांनी पुण्यात आयुक्त रँडसह आयस्टरचा वध केला.तर नाशिकमध्ये क्रांतीवीर कान्हेरे,कर्वे,देशपांडे या विशीतल्या तरुणांनी कलेक्टर जॅक्सन याला ठार केलं. इतकेच नव्हे तर,क्रांतिकारी मदनलाल धिंग्रा यांनी अँड्रीयू फ्रेझर या जुलूमी अधिकाऱ्याचा गोळ्या झाडून खात्मा केला. बंगालमध्ये खुदीराम बोस अन् प्रफुल्ल चाकी या क्रांतीवीरांनी बंगालच्या फाळणीविरुद्ध तीव्र उठाव करून फोर्टवर बॉम्बहल्ला केला. अशा लागोपाठ हल्ल्यांमुळे ब्रिटिश गवर्नमेंट पार हादरलं.हाच खरा करिष्मा होता स्वातंत्र्यवीर सावरकरांचा...

या पार्श्वभूमीवर देशांतर्गत अराजकता पसरविणे,ब्रिटिश अधिकाऱ्यांचा खून करणे,बॉम्बस्फोट घडविणे,प्रक्षोभक भाषणं करणे या गंभीर आरोपांखाली सूत्रधार म्हणून वीर सावरकरांना अटक होऊन त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. दरम्यान त्यांना लंडनहून सागरीमार्गे मोरिया बोटीतून मुंबईकडे नेतांना १ जुलै १९१० रोजी फ्रान्सच्या मोर्सेल्स बंदरावर सावरकरांनी मोठ्या शिताफीने पाण्यात उडी घेऊन पसार झाले. खरं तर,सावरकरांची ही उडी त्रिखंडात प्रचंड गाजली असून, आजही जनमानसात त्यावर चर्चा होत असताना दिसतं. वास्तवात हीच खरी शौर्यगाथा आहे..सावरकरांची अन् आपल्या जांबाज भारतीय क्रांतीकारकांची! हॅट्स ऑफ टू दिज ब्रेव्ह इंडियन वॉरियर्स.

दरम्यानच्या काळात ब्रिटिश अन् फ्रान्स सरकारच्या संयुक्त कारवाईत सावरकरांना अटक होऊन त्यांना विविध गुन्ह्यांखाली ५० वर्षांची जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली होती. त्यातली १० वर्षे त्यांनी अंदमानच्या बेटावर काळ्या पाण्याची शिक्षा भोगली.तथापि,या जुलुमी व अन्यायी शिक्षेविरुद्ध प्रचंड जनप्रक्षोभ उठल्याचे पाहून,ब्रिटिश सरकारने नरमाईची भूमिका घेत २ मे १९२१ रोजी सावरकरांची सुटका केली. या शिक्षेच्या सुनावणी दरम्यान सावरकरांना काही काळ ठाणे कारागृह मध्ये ठेवण्यात आले होते. त्यावेळी ठाण्याहून प्रस्थान करते प्रसंगी सावरकरांच्या दर्शनासाठी ठाणेकरांची रस्त्यांच्या दुफळी मोठी गर्दी उसळली होती.स्वातंत्र्यवीर सावरकरांचे दर्शन घडण्यासाठी ठाणेकर रस्त्यावर सैरावैरा धावत होते*.वास्तवात त्याकाळी सावरकरांची लोकप्रियता शिगेला पोहोचली होती.या पार्श्वभूमीवर सन १९२१ च्या पूर्वीचा कालखंड हा *सावरकर पर्व* म्हणून ओळखला जातो.त्याला भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास साक्षीदार आहे.

भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी विविध देशांचे राष्ट्रप्रमुख,क्रांतिकारी संघटना अन् तेथील अनिवासी भारतीयांकडून मदतीचा हात मिळावा,या उद्देशाने वीर सावरकरांनी फ्रान्स, जर्मनी, रशिया, हॉलंड, अमेरिका, जपान या देशांचे भूमिगत दौरे केले. तर दुसऱ्या बाजूने "अभिनव भारत" ही संघटना देशांतर्गत स्वातंत्र्य चळवळीसाठी सशस्त्र मोहीम राबवायची. सावरकरांना स्वातंत्र्य चळवळीत खुला पाठिंबा देणारे तसेच सावरकरांसह जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्यांमध्ये केशव चांदवडकर, गोपाळ पाटणकर, कृष्णाजी खरे, पुरुषोत्तम दांडेकर, गोपाळ धारप, सखाराम गोरे, श्रीधर शिंदे, वि.म.भट, दामोदर परांजपे, बळवंत बर्वे, विष्णू केळकर, सखाराम काशीकर, विनायक तिखे, दामोदर चंद्रात्रे, त्रिंबक मराठे, विनायक आमडेकर, व्यंकटेश नागपूरकर, गणेश सावरकर, नारायण सावरकर, बाबा सावरकर आदी क्रांतिकारकांचा समावेश होता. भारतमातेच्या या समस्त सपुतांना आम्हा मराठी भूमिपुत्रांचा त्रिवार मानाचा मुजरा!

**लेखक - नरेश म्हस्के**
**खासदार,ठाणे लोकसभा क्षेत्र**

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्राणपणाने लढलेल्या क्रांतिकारकांच्या स्मरणार्थ वीर सावरकरांच्या संकल्पनेतून साकारलेल्या "अभिनव भारत मंदीर" चे १४ मे १९५३ रोजी त्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.महत्वाचे म्हणजे जाज्वल्य राष्ट्रप्रेम व निस्सीम देशभक्तीचं प्रतिक असलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर लिखित," ने मजसी ने परत मातृभूमीला... सागरा प्राण तळमळला...तळमळला सागरा! आणि जयो स्तुते श्रीमहामंगले शिवास्पदे सुखदा! स्वतंत्रते भगवती त्वामहं यशोयुतां वंदे! हे स्वातंत्र्य स्तोत्र आजही आम्हा भारतीयांना प्रेरणादायी आहे. भारतीय स्वातंत्र्यासाठी दिलेल्या महान योगदानाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांना मरणोत्तर *भारतरत्न* हा सर्वोच्च नागरी पुरस्कार बहाल करावा, अशी मागणी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे अन् शिवसेनेतील खासदारांनी केली आहे. वास्तवात हीच खरी त्यांना जयंती दिनानिमित्त मानवंदना ठरेल,अशी भावना लोकसभेचा खासदार या नात्याने मी व्यक्त करत आहे.स्वातंत्र्यवीर सावरकर यांना जयंती दिनानिमित्त विनम्र अभिवादन...

वंदे मातरम्! भारत माता की जय! जय महाराष्ट्र!

# मुरबाडमध्ये वादळीवाऱ्यासह पावसाचा तडाखा

**सहा घरावरील अंशत कौले/पत्रे व भिंत कोसळून नुकसान! तर विजेच्या धक्क्याने १७ वर्षीय तरुण व दोन म्हशीचा शॉक लागून मृत्यू!**





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यात सतत वीस दिवस धो धो पाऊस कोसळत आहे. रविवार २५मे २०२५रोजी सकाळ पासूनच पावसाने रिपरिप सुरू केली होती. दुपारी सुद्धा मोठ्या प्रमाणात पाऊस बरसला. त्यानंतर सायंकाळी पाच वाजता मुसळधार पाऊस वादळी वाऱ्यासह कोसळला त्यामध्ये इंदे येथील इयत्ता दहावी मध्ये उत्तीर्ण झालेला सतरा वर्षाचा यश लाटे याचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला आहे. तर धसई हद्दीतील मौजे-कांदळी भागोजी यादव यांच्या घरावर रविवारी संध्याकाळी विज पडून दोन म्हशी मृत्यू झाल्या आहेत. या घटनेची तात्काळ दखल मुरबाड तहसील कार्यालय मार्फत घेण्यात आली आहे. ज्या /ज्या ठिकाणी घटना घडली आहे त्या ठिकाणी तलाठी सर्कल मंडल अधिकारी तसेच कर्मचारी यांनी घटनास्थळी जाऊन नुकसानाची पाहणी करून पंचनामे करण्यात आले आहे. अशी माहिती मुरबाड तहसीलदार अभिजीत देशमुख यांनी दिली आहे.

तर विस दिवसात ११० मि.मी. पावसाची नोंद झाली आहे तर रविवारी ५८मि. मी.पाऊस पडला आहे. त्यामुळे तालुक्यात आता पर्यंत एकूण १६८ मि.मी.पाऊस पडला असल्याची माहिती मुरबाड तहसीलदार कार्यालयातून देण्यात आली आहे. तर रविवारी रात्रभर पाऊस पडल्याने सर्वच ठिकाणी शेत, छोटे मोठे नाले तसेच नद्यांमध्ये पाणीच पाणी दिसून आले. तर बोरीवली येथील पुल पाण्याखाली गेल्याचे चित्र दिसून आले आहे.तसेच मुसळधर पावसामुळे व वादली वाऱ्यामुळे शिवळे-तुळई रस्त्यावरील कोरावळे गावाच्या हद्दीत रस्त्याच्या कडेचा असलेला एक झाड उन्मळून पडले आहे.

तर ग्राम महसूल अधिकारी सोनावले यांच्या तील मौजे सोनगाव कातकरीवाडी येथील लडकीबाई भोसले व भिवा भोसले यांच्या अंगावर भिंतीचा काही भाग कोसळल्याने किरकोळ जखमी झाले आहेत त्यांना उपचारासाठी टोकावडे ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# केडीएमसीच्या 'अ' प्रभागात आपत्कालीन टीमचा पाहणी दौरा

**पावसाळ्यात पाण्याचा निचारा, चेंबरची झाकणे, होर्डिंग आदी समस्यांचा घेतला आढावा**



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रातील ग्रामीण "अ" प्रभाग क्षेत्रातील टिटवाळा, बल्याणी, मोहने, आंबिवली, अटाळी, मोहेली, ऊभंर्णी, शहाड, परिसराचा केडीएमसीच्या आप्तकालीन टीमने दौरा करीत नाले सफाई कामे, गटारे सफाई आदी कामाची पाहणी केली. जेणेकरून पावसाळ्यात पाण्याचा निचारा व्यवस्थित रित्या होईल आणि संभाव्य पूरपरिस्थिती टाळता येईल. या पाहणी दौर्यात उप आयुक्त संजय जाधव, सहाय्यक आयुक्त अ प्रभागक्षेत्र प्रमोद पाटील, उप अभियंता हरुण इनामदार, अभियंता ओमकार भोईर, आरोग्य निरिक्षक मोनिशा गडे आदिसह कर्मचारी वर्गाचा समावेश होता.

"अ" प्रभागक्षेत्राचा पाहणी दौरा संपूर्ण आपत्कालीन टीम आणि सर्व संबंधित यांचे समवेत केल्याने पावसाळ्यापूर्वी ग्राऊंड रिपोर्ट घेत मुख्य नाले यांची सफाई प्रगतीपथावर असून बल्याणी परिसरात दोन क्रिटिकल ठिकाणे आढळून आली त्यापैकी एका ठिकाणी रविवारी पोकलेन उतरवून काम सुरु केले आहे. बल्याणी येथे बडोदा महामार्गाच्या कामाच्या ठिकाणी पाणी भरण्याची स्थिती होईल त्या अनुषंगाने त्यांच्या ऍथॉरिटी सोबत समन्वय साधला आहे . ते आपल्याला मशिनरी देणार असून रविवारी तात्काळ काम करणार असल्याने पाणी तुबूंणार नाही.

होर्डिंगचा संभाव्य धोका विचारात घेता 2 होर्डिंग काढण्यात आली असून पाण्याचा निचरा होण्यासाठी विपहोल मोकळे होते. छोटे नाले साफ केलेली माती उचलेली असल्याचे दिसून आले. पहिल्याच पावसात पाणी थांबू नये म्हणून विप होल मोकळे करण्यासाठी लेबर सज्ज ठेवले असून चेम्बर वरील झाकणे बसविण्याचे काम सुरु आहे. धोकादायक इमारत समस्या निर्दशनास आली नाही.पावसाळयात संभाव्य आपत्कालीन परिस्थितीत काम करण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज करण्यात आली असल्याने संभाव्य आप्तकालीन परिस्थितीत प्रशासन सज्ज झाले आहे.

# अंबरनाथ नगरपरिषदेच्या शैलेश साळुंखेची ऑलिंपिक दिशेने कुच

## दुबई पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत अव्वल बाजी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : परिस्थिती कितीही कठीण असली तरी आपला छंद जोपासण्याची मनी जिद्द हवी. त्यातूनच जेव्हा तुम्ही तुमचं इप्सित साध्य करता, तेव्हा जग तुम्हाला सलाम करतं. याचा प्रत्यय अंबरनाथ नगर परिषदेतील कर्मचारी शैलेश साळुंखे यांच्या यशाकडे पाहिल्यावर येतो. शैलेश यांनी नुकतेच दुबई येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय पावर लिफ्टिंग स्पर्धेत, ९८ किलो वजनी गटात स्कॉड्स, बेंच प्रेस, पावर लिफ्टिंग मध्ये सुवर्णपदक पटकावलंय. शैलेश साळुंखे हे गेली ३० वर्ष अंबरनाथ नगरपालिकेत नोकरी करत आहे. सध्या साळुंखे हे करविभागात शिपाई पदावर कार्यरत आहेत. त्यांचे वडिल रामु साळुंखे हे अंबरनाथच्या और्डनन्स फॅक्टरीत कामाला होते. ते जुने कसलेले पहिलवान असल्याने शरीर सौष्ठवतेचे संस्कार व व्यायामाची आवड शैलेशला लहानपणापासूनच जडली होती. अंबरनाथ नगर परिषदेत रुजू झाल्यानंतर शैलेशने खास या आवडीमुळे २७ वर्ष नगर परिषदेच्या व्यायामशाळेची जबाबदारी स्वीकारली . जिथे नोकरी सोबतच नियमित व्यायामही त्यांना करता येणं शक्य झालं. शैलेशने अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील शरीर सौष्ठव स्पर्धेत प्राविण्य प्राप्त करून अनेक पदकं मिळवली आहेत.

२०११ मध्ये विशाखापटनम येथे झालेल्या शरीर सौष्ठव स्पर्धेत ' भारतश्री ' तर २०१२ -१३ मध्ये बँगलोर व मैंगलोर येथे झालेल्या संपन्न झालेल्या ८७ वजनी गट शरीर सौष्ठव स्पर्धेत ' भारत केसरी ' हे किताबही त्यांच्या नावावर आहे. त्यानंतर पॉवरलिफ्टिंग मध्ये प्राविण्य मिळवलेल्या शैलेशने २०२३ मध्ये थायलंड येथे झालेल्या पावर लिफ्टिंग स्पर्धेत ३२ देशांमधून भारतासाठी सुवर्णपदक मिळवलंय. त्यानंतर नुकत्याच दुबई येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताकरिता सुवर्णपदक शैलेशने पटकावलंय . लवकरच डर्बन येथे होणाऱ्या ऑलिंपिक करिता शैलेश यांची भारताकडून निवड झाली आहे. शैलेश वर या यशासाठी राज्यभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शैलेश यांची मुलगी गौरी देखील ३ वर्ष राष्ट्रीय वेट लिफ्टिंग स्पर्धेत अनेक पारितोषिकं फटकावीत आहेत. या परिश्रमात शैलेशच्या कुटुंबासोबत अंबरनाथ नगर परिषदेचे माजी मुख्याधिकारी डॉ. प्रशांत रसाळ यांचीही महत्त्वाची भूमिका असल्याचे शैलेश सांगतात. या निवडी साठी विद्यमान प्रशासक, मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांनी शैलेशचे विशेष कौतुक केले. असून, पुढील कारकीर्दीत आपणही सर्वतोपरी सहाय्य करण्याचं आश्वासन दिलंय. यामुळे अंबरनाथ नगर परिषदेची पत अधिक वाढल्याचे ही गायकवाड यांनी म्हटलंय. शैलेश यांचे मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड, अतिक्रमण विभागाचे प्रमुख नरेंद्र संख्ये व जनसंपर्क अधिकारी किमया पवार यांनी प्रशासनाच्या वतीने विशेष अभिनंदन केले आहे.

# भर पावसात डोंबिवलीत फेरीवाल्यांचा मोर्चा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कष्टकरी हॉकर्स व भाजी विक्रेता युनियन आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हातगाडी, पथारी असोसिएशन महाराष्ट्र राज्य माध्यमातून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या ह प्रभाग क्षेत्र कार्यालयावर पार्किंग फलक हटवण्यात यावे आणि फेरीवाला कायद्याची अंमलबजावणी करण्यात यावी या मागणीसाठी भर पावसात धरणे आंदोलन करण्यात आले. पूर्व -पश्चिम विभागातील रस्त्यावरती पार्किंगची बोर्ड लावले तर गाड्या पार्किंग होणार मग फेरीवाले जाणार कुठे? असा प्रश्न आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला आहे. डोंबिवली पश्चिमेतील घनश्याम गुप्ते रोड वरील पार्किंग फलक पी वन, पी टू ची अधिसूचना सन २०१७ रद्द झाली पाहिजे. ज्या ठिकाणी फेरीवाले बसत नाहीत त्या ठिकाणी पार्किंगचे फलक लावल्यास आमचा विरोध नाही. पथविक्रेता उपजीविकेचे संरक्षण व पथविक्रीचे विनियमन अधिनियम २०१४ फेरीवाल्याच्या असलेल्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे आदी मागण्या मोर्चेकऱ्यांनी लावून धरल्या. अधिकृत फेरीवाल्यांचे रक्षणकर्ते व्हा भक्षणकर्ते बनू नका असा नाराही दिला. पालिकेच्या ह प्रभागक्षेत्र साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांना आज (सोमवार २६ मे) फेरीवाला जागतिक दिवस आहे याची आठवणही मोर्चाच्या शिष्टमंडळाने करून दिली.

दरम्यान ह प्रभाग क्षेत्र अधिकारी राजेश सावंत.यांना निवेदन देण्यात आले. सदर आंदोलनामध्ये विष्णुनगर पोलीस ठणेतर्फे पोलीस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात होता.

याच मुद्यावर मागे म्हणजे दि.१६ मे २०२५ रोजी इंदिरा गांधी चौक डोंबिवली पूर्व येथे धरणे आंदोलन करण्यात आले होते . आज ह प्रभागक्षेत्र कार्यालयावर धरणे आंदोलन पुढे सात दिवसांत योग्य न्याय प्रशासनांने दिला नाही तर पुढील आंदोलन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मुख्यालयावर करणार असेही जाहीर केले. सदर मोर्चात अमोल केंद्रे , बबन कांबळे, दिपक भालेराव, अभयलाल दुबे, राजू गुप्ता, काळुबाई गायकवाड, राकेश सिंग, लवजारी गुप्ता या शिष्टमंडळच्या नेतृत्वाखाली शेकडो फेरीवाले सहभागी झाले होते.

# आजचे राशिभविष्य



मेष - विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला निकाल देईल. आज तुम्ही तुमच्या व्यवसायासाठी महत्त्वाचे निर्णय घेऊ शकता.

वृषभ - आज तुमचे आरोग्य बिघडू शकते त्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. तसेच आज तुम्हाला तुमच्या मित्रांच्या रूपात असलेल्या शत्रूंपासून सावध रहावे लागेल.

मिथुन - नोकरी करणाऱ्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला आहे. खाजगी नोकऱ्यांशी संबंधित लोकांना आज आपल्या कामावर लक्ष केंद्रित करावे लागेल.

कर्क - आज तुमचे मन थोडे उदास असेल त्याचा तुमच्या कामावर देखील परिणाम होईल..कोणाचे तुमच्यावर कर्ज असेल तर आज तुम्ही ते फेडण्यात यशस्वी व्हाल.

सिंह - आज तुम्ही धार्मिक कार्यक्रमात सहभागी व्हाल त्याचा तुम्हाला नक्कीच फायदा होईल. विद्यार्थ्यांना आज त्यांच्या अभ्यासाचा फायदा होईल.

कन्या - आज तुम्हाला एखादी निराशाजनक बातमी ऐकायला मिळाल्याने तुम्ही अस्वस्थ व्हाल. मात्र यावेळी तुम्ही तुमच्या वडिलांचा सल्ला घ्याल ज्यामुळे तुमचे मन हलके होईल.

तूळ - आजचा दिवस तुमच्यासाठी सर्वोत्तम असणार आहे. कारण सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यांना आज सन्मान मिळत असल्याचे दिसते. दिवस चांगला जाईल.

वृश्चिक -आज तुमचे तुमच्या जोडीदारासोबतचे नाते मधुर असेल ज्यामुळे तुम्ही आनंदी राहाल. आज तुम्ही तुमच्या घराच्या बांधकाम आणि इंटेरिअरवर पैसेही खर्च कराल.

धनु - आज तुम्हाला तुमचे पैसे गुंतवण्याआधी वडीलधाऱ्यांचा सल्ला घ्यावा लागेल. आज जर तुम्ही मित्राच्या सल्ल्याने पैसे गुंतवले तर तुमचे पैसे बुडू शकतात.

मकर -तुमच्या कुटुंबात आज उत्सवाचे वातावरण असेल. कुटुंबात एखादे शुभकार्य किंवा शुभ घटना घडू शकते ज्यामुळे कुटुंबातील सर्व सदस्य आनंदी दिसतील.

कुंभ - विद्यार्थ्यांना मेहनत घेऊन अभ्यास करावा लागेल तरच ते यश मिळवू शकतील. अभ्यासात निष्काळजीपणा केल्यास पदरी निराशाच पडेल.

मीन - आजचा दिवस तुमच्यासाठी कठीण संघर्षाचा असेल, ज्यामुळे तुम्ही त्रस्त राहाल. तुम्हाला थकवा आणि तणावही जाणवू शकतो.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली, कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
बारावीनंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
-बीएएमएमसी-
(बॅचलर ऑफ मल्टीमीडिया अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून बारावी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in
MASS MEDIA

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# शालेय विद्यार्थ्यांसाठी दाखले शिबीर

## आमदार सुलभाताई गायकवाड यांचा महत्त्वपूर्ण उपक्रम!



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
● शरद शहाणे

कल्याण पूर्व विधानसभा क्षेत्राच्या आमदार सौ. सुलभाताई गायकवाड यांच्या संकल्पनेतून दोन दिवसीय शासकीय शैक्षणिक दाखले वाटप शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना उत्पन्नाचा दाखला, डोमिसाईल दाखला आणि स्थानिक वास्तव्य दाखले सहज, सुलभपणे उपलब्ध करून देण्यात येत असून विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी दिलेला उस्फुर्त प्रतिसाद हा सुलभताईंच्या सामाजिक बांधिलकीचा ठसा आहे अशा प्रतिक्रिया लाभार्थ्यांकडून येत आहेत.

# उन्हाळी भातपीकावर अवकाळीचे पाणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर, ता. २७ (वार्ताहर) :** तालुक्यातील भाजीपाला तसेच दुबार उन्हाळी भातपिके घेणाऱ्या शेतकऱ्यांचे अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्याची मागणी शहापूर भाजपने केली आहे.

मे महिन्याच्या सुरुवातीला भातसा धरणाच्या उजव्या कालव्यावर तालुक्यातील आवरे, कांबारे, चेरपोली, तुते, अर्जुनली, पिंपळपाडा, काळेपाडा, कवडास सरलांबे,



साजिवली, सावरशेत, खुटारी, खरीवली गावांमधील शेतजमीन ओलिताखाली आहे. येथील शेतकरी उन्हाळी भात तसेच भाजीपाल्याचे पीक घेतात. पण अचानक आलेल्या अवकाळी पावसाने त्याचे नुकसान झाले आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांनी विनंती करूनही भातसा धरण विभागाने १ मेदरम्यान कालव्याचे पाणी बंद केले नसल्याचा फटका पिकांना बसला आहे. शेतातील भाताचे उभे पीक भिजत पडले आहे. तसेच पालेभाज्या सडल्याने या नुकसानीचे त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी मंगळवारी (ता. २७) भाजपच्या आदिवासी आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक इरनक यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी, पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार परमेश्वर कासुळे यांची भेट घेऊन केली आहे.

# ट्रक बंद पडल्याने शेलार परिसरात वाहतूक कोंडी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. २७ (बातमीदार):**

भिवंडी-वाडा मार्गावर ट्रक बंद पडल्याने मंगळवारी सकाळी शेलार गावाच्या हद्दीत वाहतूक कोंडी झाली होती. त्याचा परिणाम वाहतूक व्यवस्थेवर झाल्याने नागरिकांना प्रवासी वाहनांतून उतरून भिवंडी शहर गाठण्यासाठी पायपीट करावी लागली.

गेल्या काही दिवसांपासून भिवंडीत तालुक्यात पडणाऱ्या अवकाळी पावसाने कहर केला आहे. पावसाळ्यापूर्वीची गटारांची स्वच्छता, रस्त्यांची डागडुजी झाली नसल्याने विविध अडचणी उद्भवत आहेत. भिवंडी-वाडा मार्गावरील शेलार गावात मंगळवारी सकाळी ९ वाजता दोन ट्रक रस्त्यातच नादुरुस्त झाल्याने कोंडी झाली. यामुळे वाडा मार्गे भिवंडीकडे तसेच भिवंडीकडून वाडा आणि पारोळ मार्गाकडे जाणारी वाहतूक ठप्प झाली. त्याचा परिणाम प्रवासी वाहतुकीवर अधिक झाला. वाहनांच्या रांगांमुळे एसटी, रिक्षातील प्रवाशांना भिवंडी गाठण्यासाठी पायपीट करावी लागली. त्यामुळे सकाळी नोकरी, व्यवसायानिमित्त घराबाहेर पडलेल्या प्रवासी तसेच नोकरदारवर्गाला चांगलाच मनस्ताप झाला.

पावसाची रिपरिप सुरू असताना वाहनांच्या कोंडीमुळे निघणाऱ्या पेट्रोल आणि डिझेलच्या धुरामुळे शेलार गावासह परिसराला प्रदूषणाने घेरले होते. शेलार गावात दाट वस्ती असून, रस्त्यालगत घरे असल्याने स्थानिक नागरिक हैराण झाले. ग्रामीण भागात पावसात झालेल्या घटनेची तालुका पोलिसांनी आणि वाहतूक विभागाने तहसीलदारांच्या आपत्ती विभागास माहिती दिली नाही. त्यामुळे वाहतूक कोंडी सोडवण्यास वेळ लागला.

# ठाण्यात इमारतीचा भाग कोसळला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. २७ :** वागळे इस्टेट परिसरातील ५० ते ६० वर्षे जुने बांधकाम असलेल्या 'नंदादीप' या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील छताचा आणि त्याच मजल्याच्या जिन्याच्या गॅलरीचा काही भाग कोसळल्याची घटना मंगळवारी (ता. २७) मध्यरात्री अडीचच्या सुमारास घडली. या वेळी मोठ्याने झालेल्या आवाजाने स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत त्या इमारतीमधील कुटुंबांना सुरक्षित बाहेर काढून इमारत रिकामी केली. सध्या तेथील १७ कुटुंबांना सुरक्षेच्या दृष्टीने हाजूरी रेंटल या ठिकाणी स्थलांतरित केले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

सोमवारी दिवसभर पावसाची रिमझिम सुरू होती. त्यातच मंगळवारी (ता. २७) मध्यरात्री अडीचच्या सुमारास अचानक वागळे इस्टेट परिसरातील किसन नगर नंबर १ येथे मोठा आवाज झाला. हा आवाज ऐकून स्थानिक नागरिकांनी नेमके काय झाले म्हणून पाहणी केल्यावर तेथील नंदादीप या तीन मजली इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील छताचा आणि त्या इमारतीच्या जिन्याच्या गॅलरीचा काही भाग कोसळल्याचे निदर्शनास आले. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही. याचदरम्यान शासकीय यंत्रणा येण्यापूर्वीच स्थानिक नागरिकांनी ती इमारत धोकादायक स्थितीत दिसल्याने ती पूर्णपणे रिकामी केली.

घटनेची माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाला दिल्यावर तातडीने घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन, अग्निशमन दल, पोलिस तसेच माजी लोकप्रतिनिधी आणि महापालिका अधिकाऱ्यांनी धाव घेतली, तर घटनास्थळी इमारतीचा उर्वरित भाग अत्यंत धोकादायक स्थितीत असल्याने इमारतीतील एकूण १७ कुटुंबांना सुरक्षेच्या दृष्टीने हाजूरी रेंटल या ठिकाणी स्थलांतरित केले आहे. याशिवाय सुरक्षेच्या दृष्टीने लगतच्या दोन इमारतीमधील सर्व रहिवाशांना तात्पुरत्या स्वरूपात दुसऱ्या ठिकाणी राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. उर्वरित कार्यवाही प्रभाग समिती व बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार आहे, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.



## आगाऊ पावसाळ्यामुळे

# जिल्हयांसह राज्यातील धरणांचा पाणीसाठा वाढला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यात यंदा जवळपास १० दिवस आधीच मान्सूनचे आगमन झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे ऐन उन्हाळ्यात धरणांमधील पाणीसाठा वेगाने वाढला आहे. १९९० नंतर प्रथमच मे महिन्यात राज्यात मान्सून दाखल झाला आहे. गेल्या तीन दिवसांमध्ये राज्यातील सर्व मोठ्या, मध्यम आणि लघु प्रकल्पांमधील पाणीसाठ्यात ४७ टीएमसी एवढी वाढ झाली आहे. विशेषत: राज्यातील सर्वात मोठे धरण असलेल्या उजनी धरणात गेल्या तीन दिवसांमध्ये तब्बल २८९ दशलक्ष घनमीटर एवढा पाणीसाठा वाढला असून मृतसाठ्यात असलेले उजनी धरण आता प्लसमध्ये आले आहे.

जलसंपदा विभागाच्या आकडेवारीनुसार, १९ मे रोजी राज्यातील सर्व धरणांमध्ये मिळून १८ हजार ६१७ दशलक्ष घनमीटर एवढा पाणीसाठा होता. त्यात ११ हजार ३८१ दशलक्ष घनमीटर एवढा उपयुक्त साठा होता. एकूण क्षमतेच्या २८.१० टक्के एवढा हा उपयुक्त पाणीसाठा १९ मे रोजी होता. २७ मे रोजी एकूण पाणीसाठा १९,०५२ दशलक्ष घनमीटरवर पोहोचला असून त्यापैकी ११ हजार ५२० एवढा उपयुक्त पाणीसाठा आहे. एकूण पाणीसाठवण क्षमतेच्या २८.४५ टक्के हा साठा आहे.

पावसामुळे बाष्पीभवनाचा वेग कमी झाला आहे.

पश्चिम महाराष्ट्रात सातारा, सोलापूर तसेच पुणे जिल्ह्यातील काही भागात मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे उजनीच्या पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होणे अपेक्षित आहे. मे आणि जून महिन्यात नागरिकांना पाणीटंचाईच्या झळा बसतात. मात्र, पाणीसाठा वाढत असल्यामुळे पश्चिम महाराष्ट्र, नाशिक तसेच कोकण विभागाची चिंता तूर्त मिटली आहे. कोकण विभागात पाणीसाठा वाढलेला नाही. मात्र, ढगाळ वातावरण आणि पावसामुळे बाष्पीभवनाचा वेग कमी झाला आहे.

मोठ्या-मध्यम प्रकल्पांमध्ये पाणी वाढले

नागपूर आणि अमरावती विभागात अद्याप मान्सूनचे आगमन झाले नाही. त्यामुळे या विभागातील धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झालेली नाही. मात्र, पुणे, नाशिक, कोकण आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. मोठ्या प्रकल्पांमध्ये २४ तारखेला ५ हजार ५२९ दशलक्ष घनमीटर एवढा म्हणजेच २५.९० टक्के उपयुक्त पाणीसाठा होता. तो २७ मे रोजी ७ हजार ६२७ दशलक्ष घनमीटर म्हणजे २६.२४ टक्क्यांवर पोहोचला आहे. मध्यम प्रकल्पांमध्ये हाच आकडा २४ मे रोजी २ हजार ४४ दशलक्ष घनमीटर म्हणजे ३७.१४ टक्के होता. तो २७ मे रोजी २ हजार ६६ दशलक्ष घनमीटर म्हणजे ३७.५३ टक्क्यांवर आला आहे.

मुंबई तसेच ठाणे जिल्ह्यात मान्सूनचे आगमन झाले असले तरी धरणांचा पाणीसाठा वाढण्याजोगा पाऊस झालेला नाही. उलट कोकण विभागातील पाणीसाठा ३६.८८ टक्क्यांवरून ३५.७५ टक्क्यांवर आला आहे. भातसा, मोडकसागर, तानसा, मध्य वैतरणा या धरणांमधील पाणीसाठ्यात सुमारे १ ते २ टक्के घट झाली आहे.

# केंद्र शासनाच्या कार्यालयात त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी करा

## - मराठी भाषा विभागाचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, ता. २७ :** राज्यातील केंद्र शासनाची कार्यालय बँका विमा कंपन्या रेल्वे व इतर कार्यालय यामध्ये त्रिभाषा सूत्राची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, असे आदेश सोमवारी (ता. २६) मराठी भाषा विभागाने दिले आहेत. यासाठी विभागाचे सहसचिव डॉ. नामदेव भोसले यांनी शासन आदेश जारी केला आहे.

राज्यात जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या जिल्ह्यातील केंद्र शासनाची सर्व कार्यालये, बँका, विमा कंपन्या, रेल्वे व अन्य कार्यालये यांमध्ये त्रिभाषा सूत्रानुसार मराठी भाषेचा वापर करण्यात येतो का, येत असल्यास, याबाबत पडताळणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

यासोबत केंद्रांच्या सर्व कार्यालयात मराठी भाषेचा वापर करण्यात येत असल्यास तो कसा केला जातो, यासाठी संबंधित कार्यालयाकडून स्वयंघोषणापत्र विहित नमुन्यात घ्यावे, हे स्वयंघोषणापत्र उपरोक्त नमूद कार्यालयांनी दर्शनी ठिकाणी सूचनाफलकावर प्रदर्शित करण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर नेमलेल्या समन्वय अधिकाऱ्यांमार्फत

आढावा घेण्यात यावा, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी, भाषा संचालक यांनीही या त्रिभाषा सूत्राची तपासणी, स्वयंघोषणापत्र सादर करण्यासाठी संबंधित कार्यालयाकडे पाठपुरावा करावा. पी. जी. पोर्टल व आपले सरकार प्रणाली व इतर माध्यमांतून मराठी भाषेचा वापर होत नाही, अशा विषयाच्या तक्रारी आल्यास या तक्रारींचे वेळीच निराकरण करावे, पालकमंत्री किंवा लोकप्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकांना संबंधित केंद्र शासनाच्या कार्यालयांमधील कार्यालय प्रमुखांना आमंत्रित करून त्रिभाषा सूत्रानुसार मराठी भाषेच्या वापराबाबत त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण करावी, असेही यात म्हटले आहे.



# केडीएमसी हद्दीतील नालेसफाईची खासदार सुरेश म्हात्रेंकडून पाहणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. २७** सध्या मॉन्सूनपूर्व पावसाने सगळीकडे जोरदार हजेरी लावली असली तरी मुख्य पावसाळा सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. या पार्श्वभूमीवर खासदार सुरेश उर्फ बाळ्या म्हात्रे यांनी कल्याण पश्चिमेतील चार प्रमुख मोठ्या नाल्यांच्या सफाईच्या कामाची सोमवारी (ता. २६) पाहणी केली. ही पाहणी करून मग त्यांनी अभिनव गोयल यांची भेट घेत चर्चा केली.

> **“ आज मी स्वत: कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाला भेट दिली आणि सद्यस्थितीचा बारकाईने आढावा घेतला. पावसामुळे निर्माण झालेली परिस्थिती, संभाव्य धोके आणि त्यावर तातडीने करता येणाऱ्या उपाययोजनांबाबत महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली.**
>
> ● सुरेश उर्फ बाळ्या म्हात्रे (खासदार)

यामध्ये येत्या काळात अतिवृष्टीची परिस्थिती निर्माण झाल्यास महापालिकेकडून कशाप्रकारे उपाययोजना केल्या जाणार, महापालिकेची तयारी काय आहे? नालेसफाई किती झालेली आहे? आदी महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता, तर आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास संकटात अडकलेल्या सर्वसामान्य व्यक्तीला मदत मागवण्यासाठी महापालिका अधिकारी किंवा नियंत्रण कक्षाचे फोन नंबर जारी केल्यास संबंधितांना तत्काळ मदत पोहोचवणे शक्य होईल, अशी सूचनाही सुरेश म्हात्रे यांनी या वेळी केडीएमसी आयुक्त गोयल यांना केली. त्यावर आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना बोलवून हेल्पलाइन नंबर लोकांपर्यंत पोहोचवण्याबाबत सूचना केल्याचे दिसून आले. दरम्यान, म्हात्रे यांनी आपल्या भेटीमध्ये दुर्गाडी चौकाजवळील, अंबिका नगर, जरीमरी आदी महत्त्वाच्या नाल्यांची पाहणी केली. या ठिकाणी नालेसफाईचे काम सुरू असले तरी आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास प्रशासन त्यावर कशाप्रकारे व्यवस्थापन आणि उपाय योजना करते हे त्याचवेळी दिसून येईल, असेही म्हात्रे यांनी सांगितले.

# नवी मुंबईत बेशिस्त रिक्षाचालकांवर कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
■ बातमीदार

**नवी मुंबई ;** नवी मुंबईत रिक्षांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. यामुळे कमी अंतर असल्याने भाडे नाकारणे, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी घेणे तसेच वाहतूक नियम न पाळणाऱ्या रिक्षाचालकांची संख्याही तुलनेने मोठीच आहे.

प्रवाशांच्या सुरक्षेसाठी वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून या कारवाईत २ हजार १४२ बेशिस्त रिक्षाचालकांकडून ३ लाख ३ हजार ३०० रुपयांचा दंड वसूल केला आहे.

नवी मुंबईत रिक्षाचालकांची मुजोरी दिवसेंदिवस वाढत आहे. या प्रकरणी अनेक तक्रारी वाहतूक शाखेकडे प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे वाहतूक पोलीस शाखेने १ ते २३ मे दरम्यान एक विशेष मोहीम राबवली. यात भाडे नाकारणाऱ्या ८५७ रिक्षाचालकांवर कारवाई करून ४८ हजार १०० रुपये दंड आकारण्यात आला आहे. तसेच क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणारे १ हजार २८५ रिक्षाचालकांवर कारवाई करून ५५ हजार २०० रुपये दंड आकारण्यात आलेला आहे. अशा एकूण २ हजार १४२ रिक्षाचालकांवर कारवाई करून ३ लाख ३ हजार ३०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

# ठाणे मनपाच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाला गळती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** पावसाची रिपरिप सुरु असताना ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षालाच गळती लागली असल्याचे समोर आले. या कक्षाला भेट देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोमवारी सायंकाळी आले असताना त्यांच्या समोरच छतातून पाणी ठिबकत होते. दरवर्षी पावसाळ्याआधी या कक्षाच्या छतावर प्लास्टिक टाकण्यात येते. मात्र यंदा पावसाने लवकरच हजेरी लावल्याने प्रशासनाची तारांबळ उडाली आहे.



राज्यातील मान्सूनच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर हवामान खात्याने ठाणे जिल्ह्यासाठी मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. नागरिकांची सुरक्षा सगळ्यात महत्त्वाची असून त्यासाठी सर्व यंत्रणा सतर्क आहेत, असे शिंदे यांनी ठाणे पालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाला सोमवारी भेट देतेवेळी स्पष्ट केले. शुन्य जिवितहानी हे आपले लक्ष्य आहे. त्यामुळे कोणतीही परिस्थिती उद्भवली, तक्रार आली तर कमीत कमीत वेळेत प्रतिसाद देऊन, यंत्रणांनी मदतीसाठी तत्पर असावे, असे निर्देशही शिंदे यांनी दिले. याप्रसंगी शिवसेना खासदार नरेश म्हस्के, ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपायुक्त जी. जी. गोदेपुरे, मनीष जोशी, अनघा कदम उपस्थित होते.

## यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा उपक्रम

# कारागृह बंदी बनणार छायाचित्रकार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** समाजाने फेटाळलेले, गुन्हेगारीच्या चक्रात सापडलेले आणि आपल्या चुकीच्या निर्णयामुळे जीवनात मागे पडलेले अनेक बंदी ठाणे मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत आहेत. मात्र, या बंदींना त्यांच्या आयुष्यात नव्याने सुरुवात करण्याची, एक नवी दिशा मिळवण्याची संधी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि ठाणे मध्यवर्ती कारागृहानें दिली आहे. ठाणे मध्यवर्ती कारागृहात डिजिटल फोटोग्राफी आणि व्हीडिओ हा विशेष अभ्यासक्रम प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आला आहे. या अभिनव उपक्रमातून कारागृहातच बंदींना छायाचित्रणाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणात बंदींनी जबरदस्त उत्साहाने सहभाग नोंदवला आहे. या उपक्रमामध्ये ठाण्याचे ज्येष्ठ वृत्तपत्र छायाचित्रकार प्रफुल्ल गांगुर्डे यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. ते म्हणजे त्यांनी आपले सामाजिक भान राखत बंदींना प्रशिक्षण दिले आहे. आपल्या अनुभवाचा खजिना खुला करत या बंदींना छायाचित्रणाची मूलभूत तत्त्वे, कॅमेरा हाताळणी, फ्रेमिंग, प्रकाशाचा वापर, स्टोरीटेलिंग आणि फोटो जर्नलिझम यासारख्या महत्त्वाच्या गोष्टी शिकवल्या आहेत. प्रशिक्षणाचे वर्ग आठवड्यातून दोन वेळा घेतले जात आहेत. सध्या या बंदींची प्रात्यक्षिक परीक्षा सुरू असून येत्या जून महिन्यात अंतिम लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यानंतर उत्तीर्ण झालेल्या बंदींना विद्यापीठाचं अधिकृत प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या संपूर्ण उपक्रमामध्ये जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि ठाणे कारागृह यांचा संयुक्त सहभाग आहे.

# नालेसफाईचा गाळ सायकल ट्रॅकवर !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई:** वसई पश्चिमेच्या सनसिटी येथे दररोज हजारोंच्या संख्येने नागरिक वॉक करण्यासाठी सायकल ट्रॅकवर येतात. मात्र नालेसफाईच्या दरम्यान निघालेला गाळ हा थेट सायकल ट्रॅकवर आल्याने वॉक करण्यासाठी व सायकल चालविण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची प्रचंड गैरसोय होऊ लागली आहे. त्यातच आता पाऊस कोसळत असल्याने संपूर्ण सायकल ट्रॅक चिखलमय झाला आहे.

वसई पश्चिमेतील परिसरात सनसिटी परिसरातून गास गावाकडे जाणार रस्ता आहे. हा रस्ता अतिशय मोकळा व येथील वातावरण ही मोकळे आहे. या रस्त्यावर नागरिकांना विनाअडथळा सायकल चालविता यावी यासाठी सायकल ट्रॅक तयार करण्यात आला आहे. यासाठी पालिकेने ७२ लाख रुपये इतका निधी खर्च केला आहे.

सध्या शहरात प्रदूषणाचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी व नागरिकांच्या आरोग्य सदृढ राहण्यासाठी पालिकेने हा प्रकल्प उभारला आहे. सनसिटी येथील सायकल ट्रॅक वर दररोज सकाळ-संध्याकाळ हजारोच्या संख्येने नागरिक धावणे, वॉक, सायकलिंग यासाठी येत असतात. मात्र या सायकल ट्रॅक ला लागूनच नाला गेला आहे. या नाल्याची पावसाळ्याच्या तोंडावर नालेसफाईचे काम सुरू आहे. त्यातून निघालेला गाळ हा कडेला टाकून देण्यात आला नुकताच पालिकेने तो गाळ उचलण्यास सुरुवात केली होती. मात्र गाळ उचलताना योग्य ती काळजी न घेतल्याने त्यातील संपूर्ण चिखल हा सायकल ट्रॅकवर येऊन पडला आहे. त्यामुळे येथे वॉक करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होऊ लागली आहे. आता अधूनमधून पाऊस ही सुरू झाल्याने संपूर्ण सायकल ट्रॅकवर चिखल तयार झाला आहे. त्यामुळे नागरिकांना अडचणी येत असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे. तर तिथे गाळ असल्याने मुख्य रस्त्यावर जाऊन काही नागरिक चालतात त्यामुळे भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनांची धडक लागून अपघात होण्याची शक्यता आहे असेही नागरिकांनी सांगितले आहे.




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

## मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहात प्रवेशाकरिता अर्ज सादर करण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, सेक्टर 10, प्लॉट नंबर 21 ग्रीन पार्क सोसायटी समोर कळंबोली, पनवेल येथे कार्यरत आहे. या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहात सन 2025-26 या शैक्षणिक वर्षातकरिता मोफत प्रवेश देण्यात येणार असून इच्छूक विद्यार्थीनींनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन गृहपाल, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, पनवेल श्रीमती उषा शशिकांत गुजेला यांनी केले आहे.

या शासकीय वसतिगृहात इ.8 वी पासून गरीब, हुशार, होतकरु, मागासवर्गीय अनु.जाती, अनु. जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रर्वग, आर्थिकदृष्टया मागास, अनाथ व अपंग गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. वसतिगृहात विद्यार्थीनींकरिता मोफत निवासव्यवस्था असून नाष्टा-दररोज पोहे/ शिरा/उपीट इ. पैकी एक, उकडलेली दोन अंडी, सफरचंद, ऋतुमानानुसार एक फळ व दूध तसेच भोजन व्यवस्थेमध्ये जेवण ( डाळ, भात, चपाती, भाजी/ उसळ, लोणचे, पापड इ.सह आठवडयातून दोन वेळा मासांहार ) देण्यात येते.

अभ्यासाकरिता लागणारी वहया, पुस्तके, शैक्षणिक व लेखन साहित्य देखील विनामुल्य पुरविले जाते. तसेच दैनंदिन व वैयक्तिक खर्चाकरिता म्हणून रु. 600/- निर्वाहभत्ता दिला जातो. शालेय व गणवेष पात्र महा. विदयार्थिनींना दोन संचाकरिता गणवेष भत्ता/रेनकोट/छत्री भत्ता दिला जातो. या व्यतिरिक्त संगणक, ग्रंथालय सुविधा, क्रिडासाहित्य, मनोरंजन इ. अनेक सुविधा उपलब्ध आहेत. प्रवेशपात्र विद्यार्थीनींच्या पालकांचे सर्व मार्गानी वार्षिक उत्पन्न अनु.जाती, अनु.जमाती विद्यार्थीनींकरिता रुपये 2 लाख 50 हजार चे आत व विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रर्वग विद्यार्थीनींकरिता रुपये 1 लाखाचे आत असावे. ऑनलाईन प्रवेश अर्जासोबत तहसिलदार यांचे सहीचा सन 2025-26 मधील उत्पन्नाचा दाखला, जातीचे मुलकी अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र, मागील इयत्ता पास झाल्याचे गुणपत्र, आधारकार्ड या आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहेत.

सन-2025-26 या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृह प्रवेश अर्ज हे वसतिगृहात उपलब्ध करण्यात आलेले आहेत. अधिक माहितीकरिता गृहपाल श्रीमती उषा शशिकांत गुजेला (गृहपाल) (दू.क्र. 8767339974) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

## केडीएमसीच्या आय प्रभागातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे उपायुक्त अवधुत तावडे यांच्या उपस्थितीत आय प्रभागाचे सहा.आयुक्त भारत पवार यांनी रविवारी कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी वसार येथील ३२ खोल्यांचे बांधकाम आणि ८ जोते यावर निष्कासनाची कारवाई केली त्याचप्रमाणे नांदिवली येथील ८ खोल्यांच्या बांधकामांवर आणि ७ जोत्यांवर निष्कासनाची कारवाई केली.

हि कारवाई प्रभागातील कर्मचाऱ्यांच्या मदतीने आणि 2 जेसीबीच्या सहाय्याने करण्यात आली. प्रशासनाच्या अनाधिकृत बांधकामवर तोडक कारवाई च्या बडग्यामुळे भुमाफिया,अनाधिकृत बांधकाम करणार्या चे चे धाबे दणाणले असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## देव्हराळवाडी येथील राहते घर कोसळून महिला जखमी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


मुरबाड : मुरबाड शहरापासुन अवघ्या पाच कि.मी.अंतरावर असलेल्या फणसोली ग्रामपंचायत हद्दीतील देव्हराळवाडी आदिवासी वस्तीतील भरत जैतू भस्मा यांचे राहते घर सतत पडणाऱ्या पावसामुळे कोसळले असून घरात असणारी माणसे जखमी झाली आहेत. ग्रामस्थांनी छपराखाली अडकलेल्यांना बाहेर काढुन जखमींना उपचारासाठी सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे. सुदैवाने कोणतीही जिवित हानी झाली नसल्याचे समजते.

आदिवासी समाजाला मागेल त्याला घर सध्या शासन देत असताना या आदिवासी बांधवावर आज ऐन पावसाळयात उघड्यावर आपला संसार थाटण्याची वेळ आली आहे.तालुक्यातील गावचे पुढारी व त्याचे नातलग, बगल बच्चे, जमिनदार, सरकारी नोकरदार यांना शासकीय घरकुलाचा लाभ मिळाला परंतु खरा लाभार्थी आजही दुर्लक्षित असून तो लाभा पासून वंचित आहे ही तालुक्यातील मोठी शोकांतिका आहे. जर या आदिवासी बांधवाला घरकुलाचा लाभ मिळाला असता तर त्याच्यावर आज उघड्यावर राहण्याची वेळ आली नसती याचा विचार सरकारी बाबू कधी करतील .या आदिवासी बांधवाला लवकर न्याय मिळावा अशी अपेक्षा येथील ग्रामस्थ करत आहेत.





> देव्हराळवाडी येथिल घटना गंभीर असून या कुटुंबाला यापुर्वी घरकुलाचा लाभ मिळायला हवा होता. कुटुंबाच्या मदतीसाठी मा.जिल्हाधिकारी ठाणे यांच्याशी बोलून मदत मिळण्यासाठी प्रयत्न केले जातिल. सध्या महसूल विभागाच्या वतीने तात्पुरती मदतही दिली जाईल
> - अभिजीत देशमुख, तहसीलदार मुरबाड





## निरंकारी भक्तांचे उत्स्फूर्त रक्तदान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने, संत निरंकारी सत्संग भवन, भाईंदर पूर्व येथे रविवारी एका भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांची दिव्य शिकवणूक आत्मसात करत मुसळधार पावसाची तमा न बाळगता 'रक्त नाड्यांमधून वाहावे, नाल्यांमध्ये नको' या दिव्य संदेशाने प्रेरित १७३ निरंकारी भक्तांनी या रक्तदान शिबिरामध्ये रक्तदान केले, ज्यामध्ये १३० पुरुष तर ४३ महिला रक्तदात्यांचा समावेश होता. संत निरंकारी रक्तपेढी, विलेपार्ले यांनी या शिबिरामध्ये रक्त संकलन केले.

या कार्यक्रमाला मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती अध्यक्ष रवी व्यास आणि माजी नगरसेवक प्रविण पाटील यांनी सदिच्छा भेट देऊन रक्तदात्यांचा उत्साह वाढविला व संत निरंकारी मिशनच्या मानवतावादी कार्याचे कौतुकही केले. स्थानिक सेवादल युनिट आणि एसएनसीएफचे स्वयंसेवक यांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिले.

## डोंबिवलीत राष्ट्रीय सुरक्षा जनजागृती कार्यक्रम संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राष्ट्रीय सुरक्षा समितीच्या निर्देशानुसार आणि नागरी संरक्षण दलाचे उपनियंत्रक विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली डोंबिवली पूर्व येथील भाऊ काका उद्यान, टिळक नगर पोलीस स्टेशन जवळ, सर्वोदय नगर पाथर्डी येथे रविवार, दि.25 मे 2025 रोजी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हा कार्यक्रम डोंबिवली स्काऊट गाईड संस्थेचे पदाधिकारी आणि हुतात्मा प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष राजू घुले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. रामनगर, डोंबिवली पूर्व (सिव्हिल डिफेन्स, ठाणे) चे डिव्हिजनल वॉर्डन डॉ.राहुल घाटवळ यांनी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन केले. त्यांना त्यांचे सहकारी स्वयंसेवक अशोक धांधा, अमर कुलकर्णी आणि जतीन मोता यांनी चर्चा व परिसंवादात सहकार्य केले.

या कार्यक्रमात सद्य:स्थितीतील आपत्कालीन मार्गदर्शक सूचना (इशारा प्रणाली, क्रॅश ब्लॅकआउट, नागरिकांची कर्तव्ये, अफवांची माहिती) यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच नागरिकांना आपत्कालीन विमोचन पद्धतीचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले, जेणेकरून नागरिक स्वतःचे व आपल्या कुटुंबियांचे जीवन सुरक्षित ठेवू शकतील. नागरी संरक्षण दल (सिव्हिल डिफेन्स कॉर्प) कसे कार्यरत आहे, याचीही माहिती उपस्थितांना देण्यात आली.

या सत्रात प्रत्येक सोसायटीच्या कोअर कमिटीच्या सदस्यांनी भाग घेतला आणि त्यांच्या सोसायटीमधील प्रत्येक सदस्याला ही माहिती देण्याची इच्छा व्यक्त केली. यामुळे नागरिकांना आपली सुरक्षा स्वतः करता येईल, अशी अपेक्षा आहे.पुढील आठवड्यात याच ठिकाणी नागरी संरक्षण दलाच्या प्राथमिक प्रशिक्षण कोर्सचे नियोजन करण्याची इच्छाही अनेकांनी दर्शवली. या कार्यक्रमाला लक्ष्मीकांत कुलकर्णी, विनायक पवार, हितेश गुप्ता, सुनील जोशी, ईश्वर पाटील, आरती पाटील या रहिवाशांनी सहकार्य केले. टिळकनगर पोलीस स्टेशनचे सहाय्य उपलब्ध झाले आणि पोलीस उपनिरीक्षक श्री. विचारे याप्रसंगी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नागरी संरक्षण दल, नवी मुंबई, समूह ठाणे (रामनगर विभाग) आणि संताजी प्रौढ शाखा, पाथर्ली/गोपाळ नगर, लोकमान्य नगर, डोंबिवली पूर्व यांनी यशस्वी नियोजन केले.



## महापालिकेच्या १४ शाळांमधील सौरऊर्जा निर्मिती प्रकल्पांचे आयुक्त अभिनव गोयल यांच्या हस्ते लोकार्पण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

छोटे ,छोटे सौरऊर्जा निर्मिती प्रकल्पही मोठमोठ्या प्रकल्पांइतकेच महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज केले. लोकसहभागातून महापालिकेच्या 14 शाळांवर उभारण्यात आलेल्या सौरऊर्जा निर्मिती प्रकल्पांचे आज एकाचवेळी आयुक्त अभिनव गोयल यांचे हस्ते लोकार्पण करण्यात आले यावेळी उपस्थित मान्यवरांशी संवाद साधताना आयुक्त गोयल यांनी हे प्रतिपादन केले.

केंद्र आणि राज्य सरकारच्या पुढाकारातून देशामध्ये सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प वाढत चालले आहेत. पारंपरिक ऊर्जा स्त्रोतांची उपलब्धता पाहता सौर ऊर्जा निर्मितीसाठी केंद्र सरकारने एक लक्ष्य निर्धारित केले आहे. परंतू देशाचा प्रत्येक परिसर सहभागी होणार नाही तोपर्यंत हे लक्ष्य गाठता येणार नाही आणि कल्याण डोंबिवली महापालिकेच्या शाळांमध्ये बसविण्यात आलेले हे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प त्यामध्ये खारीचा वाटा उचलतील असे सांगत त्यासाठी पुढे आलेल्या नामांकित व्यक्ती, संस्था, बांधकाम विकासक आणि इलेक्ट्रिक संघटना यांचे आयुक्त अभिनव गोयल यांनी आभार मानले. तसेच यासाठी मिशन मोडवर काम केलेल्या विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत आणि त्यांच्या संपूर्ण टीमचेही आयुक्तांनी विशेष कौतुक केले.



महापालिकेच्या विद्युत विभागातर्फे पहिल्या टप्प्यामध्ये कल्याण डोंबिवलीतील 14 शाळांमध्ये 50 किलोवॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्यात आले असून त्यासाठी 25 लाखांहून अधिक खर्च आला आहे. हे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी रिजेन्सी ग्रुप, वैष्णवी बिल्डकोन, कल्याण रनर्स ग्रुप, रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण, मोहन खेडा ग्रुप, स्वामी नारायण लाइफ स्पेसेस, थारवानी इन्फ्रा, बिर्ला वन्य, वेस्ट पायोनियर यांच्यासह मे. एस.एस इलेक्ट्रिल वर्क्स, जे.डी इलेक्ट्रिल वर्क्स, मे एस.एस इलेक्ट्रिक कंपनी,एमजी इलेक्ट्रिक अँड कंपनी, टॉप इलेक्ट्रिकल, आशिर्वाद इलेक्ट्रिकल, त्रिमूर्ती एंटरप्रायजेस, रॉयल इलेक्ट्रिकल, किरण इलेक्ट्रिकल, इंटरफेस डिजिटल, एअरटेक सोल्युशन, नेहल प्रॉपर्टी, मल्हार इलेक्ट्रिक वर्क्स, तुषार इलेक्ट्रिकल, के.बी इलेक्ट्रिकल अँड कंपनी आणि कल्याण इव्हेंट्स यांच्या माध्यमातून अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे. तर एमसीएचआयचे उपाध्यक्ष मिलिंद चव्हाण हे महापालिकेच्या इतर 16 शाळांमध्ये सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्याची जबाबदारी घेणार असल्याचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी यावेळी सांगितले.

यासमयी वीज बचतीचा संदेश घेऊन विद्युत विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी बनवण्यात आलेल्या विशेष टीशर्टचेही यावेळी आयुक्तांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

या कार्यक्रमाला शहर अभियंता अनिता परदेशी, उपआयुक्त संजय जाधव, रमेश मिसाळ, शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### मुरबाडमध्ये मंत्री पाशा पटेल यांच्या उपस्थितीत

## बांबू लागवड मेळावा संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार वनपट्टे आणि खाजगी जमिनीवर गेले अनेक वर्ष बांबू लागवड मोहिम राबविली जाते.त्यातून पर्यावरण पुरक उपक्रम ही साधला जातो तसेच बांबू लागवड ही साधी सुलभ असून अत्यंत कमी खर्चाची असते.एकदा लागवड केली की अनेक वर्ष त्यातून उत्पादन घेता येते.आदिवासी बांधवाना मिळालेले वनपट्टे व खाजगी जमिनीवर ही बांबू लागवड केली जाते .बांबू लागवडीतून आदिवासी बांधवाना रोजगार निर्मिती होऊन कुटुंबाला चांगल्या प्रकारे आर्थिक मदत यातून होत असते.

श्रमजीवी संघटना मुरबाड तालुक्याच्या वतीने एक दिवशीय बांबू लागवड शिबिराचे आयोजन एम.आय.डी.सी हॉल मुरबाड येथे करण्यात आले होते. या मेळाव्यासाठी महाराष्ट्र राज्याचे कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष (मंत्री दर्जा) पाशा पटेल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी मंत्री पाशा पटेल यांनी बांबू लागवड व शासनाच्या ईतर योजनांची सखोल माहिती उपस्थित आदिवासी बांधवांना दिली.तर या मेळाव्यासाठी श्रमजीवी संघटनेचे राज्य अध्यक्ष रामभाऊ वरणा,मुरबाडचे तहसीलदार अभिजीत देशमुख,संघटनेचे राज्य सरचिटणीस बाळाराम भोईर,ठाणे जिल्हा सरचिटणीस दशरथ भालके,मुरबाड तालुका सचिव दिलीप शिद,सुरज राजपूत यांच्यासह, मुरबाड महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी व मोठ्या संख्येने आदिवासी बांधव उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांच्या ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत

## जिल्हा परिषद ठाणे शिक्षण विभागाकडून आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : इ. ११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी सुरू झाली असून, सर्व पात्र विद्यार्थ्यांनी [https://mahafyjcadmissions.in] (https://ahafyjcadmissions.in) या अधिकृत संकेतस्थळावरून वेळेत ऑनलाईन अर्ज भरावा, असे आवाहन जिल्हा परिषद ठाणेच्या शिक्षण विभागाने केले आहे. सदर प्रवेश प्रक्रियेबाबत सुधारित वेळापत्रक जाहीर झाले आहे सदर वेळापत्रकाप्रमाणे सर्व पालक व विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत अर्ज सादर करावेत.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ललिता दहीतुले यांचा कोट "विद्यार्थ्यांची 11 वी प्रवेश प्रक्रिया ही संपूर्णतः ऑनलाईन आहे त्यामुळे पालक व विद्यार्थी यांनी विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज भरावेत जेणे करून विद्यार्थ्यांना आवश्यक त्या शाखांमध्ये प्रवेश घेणे सुलभ होईल. पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी mahafyjcadmissions.in या संकेतस्थळावरून प्रवेशासाठी नोंदणी करावी. विद्यार्थी नोंदणीकरिता अंतिम दिनांक ०३ जून, २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत आहे."



**उतणे चिंचवली ग्रुप ग्रामपंचायत सौ. सविता संजय कशिवले यांची बिनविरोध सरपंच पदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !**




## नडगाव-दानबाव ग्रामपंचायत सरपंच पदी अरुणा चौधरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : नडगाव-दानबाव ग्रामपंचायत सरपंच पदि अरुणा सतिश चौधरी याची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

आप आपसात ठरल्याप्रमाणे प्रमिला प्रकाश लोणे यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिला होता, जिल्हा अधिकारी यांच्या आदेशानुसार तसेच कल्याण तहसीलदार यांच्या आदेशानुसार सरपंच पदाची निवडणूक घेण्यात आली, सरपंच पदा साठी अरुणा सतिश चौधरी यांनी अर्ज निवडणूक अधिकारी तथा सभेच्या अधयक्षा दर्शना भावे यांच्या कडे दाखल केला,सदस्य उषा लोणे,प्रमिला लोणे,शेवताबाई जाधव, कैलास रावते व अरुणा चौधरी ,ग्रॉमसेवक प्रसेन गोतारणे,उपस्थित होते,सरपंच पदाकरिता एकच अर्ज आल्याने निवडणूक अधिकारी दर्शना भावे यांनी अरुणा चौधरी याची सरपंच पदि निवड झाल्याचे जाहीर केले, यावेळी कार्यकर्ते यांनी फटाके वाजवुन गुलाल उधळून आनंद व्यक्त केला,

नवनिर्वाचित सरपंच अरुणा चौधरी यांना शुभेच्छा देण्यासाठी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक उपाध्यक्ष अरुण पाटील, शिवसेना तालुका प्रमुख वसंत लोणे, उपजिल्हा प्रमुख सुदाम पाटील, माजी सरपंच आदेश चौधरी, रवींद्र जाधव,अँड संतोष भोईर, विजय भोईर ,सदिप चौधरी,यांच्या सह आदि उपस्थित होते.






'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अँड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024